**Mangesh Dhenge,**
**Primary School Teacher**



**तेजस्वी युवकांचं 'निर्माण स्थळ'**

तसं मला अनेकदा जाणवायचं की, माझ्यात निर्मिकाने काहीतरी वेगळं 'रसायन'ओतलंय; पण ते रसायन नक्की कोणतं? त्याची तीव्रता किती? त्याच्या मर्यादा कोणत्या? शक्तीस्थळं कोणती? व सुधारणा क्षेत्रं कोणती? हे सर्व मला 'दाखवून' दिलं 'निर्माण' ने.....
डॉ. अभय व डॉ. राणी बंग व विवेकजी सावंत यांच्या प्रेरणा व दुरदृष्टीतून प्रारंभ झालेलं 'NIRMAN' हे केवळ एक शिबीर नसून मूल्याधारीत,तेजस्वी युवकांचं 'निर्माण स्थळ' आहे.
माझा संदिग्धता ते स्पष्टता, धरसोड वृत्ती ते अढळ निष्ठा, संभ्रम ते अविचलता, चाचपडणे ते अदम्य विश्वास, संशय ते समर्पण हा प्रवास 'निर्माण'मुळे होतोय....
स्वतःवरचा, जीवनाच्या सौंदर्य व मांगल्यावरचा, मनुष्यातल्या सुअंशावरचा विश्वास वाढवणारा माझा परमसखा बनला-'निर्माण'.....
आज मी एकता नाही, सामाजिक बांधिलकी जपून कार्य करणारे, तेजस्वी, अर्थपूर्ण जीवन जगणारे असे हजाराहून अधिक 'निर्माणी'(Nirman Community) यांचं निस्वार्थ प्रेम, बळ व मार्गदर्शन मला सदैव हक्काने मिळतंय.....
आपण पण या प्रवासात सामील होऊ शकता.